# लोकमंगल को - ऑप. बँक लि., सोलापूर.

१२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर. फोन : (०२१७) २७३५५०३, ६६



| नोंदणी क्र. एस.यु.आर./बी.एन.के./(ओ) १२९ सन १९९६ - ९७ दि. ०७/०१/१९९७ | आर. बी. आय. लायसन्स नं. व तारीख महा. १५४३ पी. दि. ०६/०२/१९९८ |
|---|---|



## २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### ◆ फक्त सभासदांसाठी ◆

सन्माननीय सभासद बंधू - भगिनींना कळविण्यात येते की, आपल्या बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १९/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. ॲम्पी थिएटर, हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे. ही नम्र विनंती

❊ सभेपुढील विषय ❊

१) मागील दि. १८/०८/२०२४ च्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद पत्रक, नफा - तोटा पत्रक स्विकारणे व वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची दोषदुरूस्ती अहवालासह माहिती घेणे.

३) सन २०२४ - २०२५ सालाच्या नफा वाटणीस मान्यता देणे.

४) सन २०२५-२०२६ वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या खर्च उत्पन्नाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२४ -२५ च्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

५) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षा करीता वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे

६) सन २०२५-२०२६ सालासाठी अंतर्गत व कनकरंट तपासणीसाची नेमणूक करणे व फी ठरविणे.

७) वसुलीचा हक्क अबाधित ठेवून संशायित व बुडीत कर्ज खाते निर्लेखीत करण्याताबबत विचार विनीमय करणे.

८) महाराष्ट्र शासनाने नागरी सहकारी बँकना लागू केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजना व तडजोड योजनेअंतर्गत थकीत कर्जदारांना व्याजात दिलेले सूट रकमेस मान्यता देणे .

९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांच्या रजेस मान्यता देणे.

१०) मा. चेअरमन सो यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयाचा विचार करणे.

**सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनी उपस्थित राहावे अशी नम्र विनंती आहे.**

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**राजेशसिंह एल. बायस**
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : सोलापूर
दि. ०५/०७/२०२५

---

## ◆ टिप ◆

१) पुरेशा गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी ठरलेल्या वेळेपेक्षा अर्ध्या तासानंतर त्याचठिकाणी घेतली जाईल. त्या सभेस पुरेशी गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२) सन २०२४ –२०२५ चा ऑडिटेड ताळेबंद, नफातोटा पत्रक, अंदाजपत्रक व अहवाल बँकेच्या प्रधान कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर सर्व सभासदांच्या माहितीस्तव उपलब्ध करून ठेवला आहे.

३) ताळेबंद पत्रक व नफा–तोटापत्रक यासंबंधी सभेत काही माहिती किंवा स्पष्टीकरण विचारावयाचे असल्यास, सभासदांनी दि. ११/०७/२०२५ च्या आत बँकेच्या वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी कळविल्यास माहिती देणे सोयीचे होईल. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.